मार्केटिंग/पणन संचालनालय लोगो

# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

३रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
पीबीएक्स् क्र. ०२०-२६१२६७८५ /२६१२६६२८
Email Id: dml.dirmkt@gmail.com Website: www.mahapanan.maharashtra.gov.in

जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/3765/२०२३ दि: /०४/२०२३
22/05/2023

## परिपत्रक

**विषय : थेट पणन परवान्याच्या अनुषंगाने ऑनलाईन माहिती भरणा करणेबाबत**

**वाचावे :** १.या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पणन५/थेट पणन/ परिपत्रक/ कामकाज/ १२४१/१३, दि.२५/०३/२०१३
२.या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. पणन ५/खा.बा./परिपत्रक/कामकाज/ १७१४/१३, दि.२९/०४/२०१३
३.या कार्यालयाचे शुध्दिपत्रक जा.क्र.पणन/परिपत्रक/थेट पणन परवाना/ ६५३७/२०१६, दि.२०/०७/२०१६
४.या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.पणन-५(अ)/थेट पणन/परिपत्रक/सूचना/ १६१९/२०२१, दि.३१/०३/२०२१
५. थेट पणन परवान्यातील अटी शर्ती
६. थेट पणन परवान्यासोबत मंजूर मार्गदर्शक तत्वे
७. परवाना प्रस्तावासोबत सादर केलेले ॲफीडेव्हीट

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५ (डी) व नियम, १९६७ मधील ४ (बी) नुसार थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करण्यासाठी या कार्यालयामार्फत थेट पणन परवाना देण्यात येतो.सदर अधिनियम, नियमातील तरतूदी, परवान्यातील अटी शर्ती, कामकाजाची मार्गदर्शक तत्वे व या बाबतच्या परिपत्रकीय सूचनांस अनुसरुन थेट पणन परवाना धारकाने कामकाज करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने या कार्यालयाने उपरोक्त परिपत्रकीय सूचना देखील निर्गमीत केलेल्या आहेत.

थेट पणन परवान्यातील निर्देश, परवान्यासोबत मंजूरी दिलेली मार्गदर्शक तत्वे, व परवाना प्रस्तावासोबत सादर केलेले प्रतिज्ञापत्रानुसार थेट पणन परवानाधारकाने खरेदी केलेल्या शेतमालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावर शेतमाल आवकेबाबत दररोज माहिती भरणा करणे बंधनकारक आहे. तथापि बहूतांश परवानाधारक सदर माहिती भरणा करीत नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास येत आहे.



Scanned with OKEN Scanner

शासन शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना जाहीर करीत असते. अशा कल्याणकारी योजना जाहीर करताना आपणाकडून ऑनलाईन भरणा केलेल्या शेतमालाच्या माहितीच्या आधारे अशा योजनांचा आराखडा तयार केला जातो. तरी आपणास सुचित करण्यात येते की, आपण शेतकऱ्यांकडून घेतलेल्या शेतमालाची माहिती पणन मंडळाच्या संकेतस्थळावर भरणा न केल्यामुळे राज्यातील शेतकरी शासकीय योजनांच्या लाभापासुन वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील व आपणाविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल यांची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(विनायक कोकरे)
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रती :-**
थेट पणन परवानाधारक (सर्व)

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)



Scanned with OKEN Scanner